**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

**वर्ष ८५ वे) प्रभुतरुण मुंबई, मंगळवार, ता. १६ माहे फेब्रुवारी, सन २०१० (अंक ९६८**

*संपादकीय*

## या जन्मावर, या जगण्यावर

**-सुहासिनी कीर्तिकर**

आजकाल सर्वतोमुखी चर्चेचे विषय सारखेच असतात. हो ना? ‘सारेगमप’मध्ये धनगरच का पहिली? ‘शिक्षणाच्या……’म्हणत पूर्ण वेळच्या शिक्षणमंत्र्याच्या शोधात फिरणारी युवा पिढी, सातच्या सिरीयलसाठी ‘सातच्या आत घरात’ राहण्यासाठी अन् ‘ट्रेन’मध्ये त्यावर बोलण्यासाठी धडपडणारे नोकरदार, ‘स्वाइन फ्लू’ पेक्षाही हैराण करणारा रोग असणाऱ्या आत्महत्या, दुधा-धान्याचे अस्मानाला भिडणारे चढते भाव, ‘ग्लोबल वॉर्मिंग’, वितळते बर्फ, धुंदफुंद असणाऱ्या वाहकांकडून घडणारे अपघात, सवयीचे झालेले घातपात, भाजी अन् बाजार यांचे ‘भावखाऊ’ भाव… अशा अनेकानेक गोष्टींवर हवापाण्याच्या गप्पा कराव्यात तशा सहजतेने अन् अपरिहार्यतेने चर्चा झडतात. ‘कुणीही यावे, टपली मारून जावे’ अशी झालेली आपली (?) मुंबई अशा चर्चेमध्ये रंगते आहे. तिचा बापडीचा स्वत:च्या अस्मितेचा प्रश्न, आहे तिथे आहेच थिजलेला!

विचार करायचा म्हटलं तर खरंच थिजून जाण्याजोगीच ही अवस्था. (काऽऽय ही अवस्था?) ही परिस्थिती आजचीच आहे का? जसे आयुष्यात चढउतार असतात; तसे कालिक, वैश्विक चढउतारही असतात. कोणे एके काळी महागाई नव्हती? होती हो होती! अगदी सोने पंधरा रुपये तोळा (ज्ञानेश्वरीत सोन्याचा उल्लेख म्हणूनच ‘पंधरेया’ असा आहे.) असतानाच्या काळातही होती की महागाई. सोळाव्या शतकातले रामदासस्वामी तत्कालीन परिस्थितीचे सविस्तर चित्रण करताना दिसतात आपल्याला.

*धान्ये माहाग माहाग तैसेही मिळेना*
*कैसे होईल होईल होईल कळेना।।*
*सुडके पटकर पटकर न मिळे पांघराया*
*(सुडके =वस्त्र)*
*शक्ती नाही रे नाही रे कोंपट कराया*
*(कोंपट = खोपटे)*
*रांडा पोरांच्या पोरांच्या तारांबळी होती*
*मोल मजुरी भीकारी होऊनी वाचती।।*
*काळ आला रे आला रे जाहले उदास*

अशी परिस्थिती दाखवून मग सामान्य माणसे म्हणून ‘देवदेव’ करण्याकडे वळतात; असा निष्कर्ष समर्थ काढतात. ‘शास्त्रांचा बाजार भरला। देवांचा गल्बला जाला।’ ही वैचारिक गोंधळाची, परिस्थितीच्या रेट्यामुळं बावरून, गांगरून जाण्याची गती सोळाव्या शतकात होती अन् आज एकविसाव्या शतकातही आहे. आजची परिस्थिती पाहून महेश केळुसकरांसारखा एखादा कवी ‘रामदासी श्लोका’च्या धाटणीने म्हणून जातो-,

‘चर चर मन भाजे वर्तमानी उन्हाने’

पण मित्रहो, परिस्थिती तीच असली तरी दोन शतकांतील संदर्भ किती कितीतरी वेगळे आहेत. व्यक्त होणारे आयाम वेगळे आहेत.

तेव्हा ‘अस्मानी सुलतानी’ होती. म्हणजे निसर्गदत्त असा दुष्काळ होता. तो ‘अस्मानी.’ आज वैज्ञानिक प्रगतीच्या आलेखाने माणूस अशा ‘अस्मानी’वर मात करत कृत्रिम पाऊसही पाडू लागला आहे. धरणे, वीज यांचे प्रकल्प राबवू लागला आहे. जागतिकीकरणानं त्याच्या माहिती-ज्ञानाच्या कक्षा रुंदावत चालल्या आहेत. ‘अस्मानी’ आलीच तर त्यावर काही ना काही तरणोपाय तो शोधतो आहे. पण आज असलेल्या त्याच्या

(पान २, कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## आऽऽऽऽल इज वेऽऽऽऽल

**- मिनाक्षी जयकर**

‘‘आई, मी आताच स्टेशनवर उतरलीये. दहा मिनिटात घरी पोहोचेन. काळजी करू नकोस.’’

‘‘अगं तू कुठे उभी आहेस? मी चार फेऱ्या मारल्या इथून .पण कुठे दिसलीच नाहीस!’’ ‘‘अरे मी अमक्या दुकानाच्या कोपऱ्यावर उभी आहे. अर्ध्या तासापासून एकाच जागी तर उभी आहे.’’ ‘‘मग दोन मिनिटं तिथेच थांब. मी येतोच तिथे.’’

‘‘मि. राणे आताच बाहेर गेले. पण तुम्ही त्यांच्या मोबाईलवर त्यांना कॉन्टक्ट करू शकता?’’

मला वाटते वानगीदाखल एवढे संवाद पुरेसे आहेत. रस्त्यात, बाजारात, दुकानात, ऑफिसमध्ये, घरी-दारी कुठेही गेलं तरी अशाप्रकारचे संवाद सर्रास ऐकायला मिळतात. कानाला फोन चिकटवून रस्ता ओलांडणारे, क्वचित प्रसंगी गाडी चालवणारेही दिसणं ही नित्याची गोष्ट झाली आहे. एकेकाळी फोन घरात असणं ही चैनीची वस्तू होती. त्या गोष्टीचं अप्रुप होतं. आठवतं- ‘मेरे पिया गये रंगून, वहाँसे किया है टेलिफुन…’ हळुहळू टेलिफोन ही गरज बनत गेली. आणि या मोबाईलच्या क्रांतीनंतर तर त्याच्याविना काही तास घालवणं हा विचारही अशक्य कोटीतला वाटतो. दिवसातले सर्व व्यवहार- अगदी सकाळच्या गजरापासून मिटींग, मेल्स् सर्व काही हा आपला मोबाईल मॅनेज करत असतो. एक वेळ हाताला घड्याळ नसलं तरी चालेल. पण मोबाईलशिवाय घरातून बाहेर पडणं हल्ली परवडणारं नसतं.

अशा या मोबाईलला भारतात येऊन यंदा पंधरा वर्ष झाली. काल-परवा आला म्हणता-म्हणता हा मोबाईल चक्क पंधरा वर्षांचा झाला. या पंधरा वर्षात त्याने आपलं जीवन पूर्णत: व्यापून टाकले आहे. फोनचा मूळ उद्देश हा दोन व्यक्तींमधील संभाषणाचा. पण त्या मूळ उद्देशा-व्यतिरिक्त रोजच्या व्यवहारातील असंख्य कामं हा मोबाईल करत असतो- गजर लावणं, एखाद्या मिटिंगची आठवण करणं, कोणाला निरोप पाठवणं, ई-मेल करणं, एक ना अनेक. रस्त्याने जाता जाता एखादा क्षण वा एखादी घटना पटकन कॅमेऱ्याने टिपणं हे सुद्धा मोबाईलमुळे शक्य होतं. राहुल गांधीच्या मुंबई भेटीच्या वेळी त्याचा जनसंपर्काचा ‘प्रवास’ किती जणांनी त्यांच्या मोबाईलवरील कॅमेऱ्यात बंदिस्त केला असेल? अशावेळी फोनच्या मूळ उद्देशाएवढेच, तर कधी-कधी जास्तीच महत्त्व या दुय्यम उद्देशांना येते. गरीब-श्रीमंत, तरुण-वृद्ध सगळ्यांकरता मोबाईल आता तेवढ्याच गरजेचा झाला आहे.

अर्थातच प्रत्येक यशस्वी संशोधनाप्रमाणे मोबाईलच्या वापरा-वरही टीका होतेच. मोबाईलवर बोलता बोलता रस्ता ओलांडणं किती धोकादायक आहे हे कोणाला वेगळं सांगायची आवश्यकता नाही. पण आज सर्वत्रच हे चित्र दिसतं. गाडी चालवताना मोबाईल वापरण्यावर कायद्याने बंदी घातली आहे. पण किती जण हे बंधन पाळताना दिसतात? तरुण पिढीवर त्याच्या होणाऱ्या परिणामावरही आक्षेप घेतला जातो. कुठल्याही गोष्टीचा अतिवापर वाईट, त्याला मोबाईलही अपवाद कसा असणार? मोबाईलमधून बाहेर

(पान २, कॉलम २ वर)

(पान१, कॉलम २ वरून)

'मनमानी'चे काय? आज 'सुलतानी' नाही. परकीय आक्रमणानं येणारं पारतंत्र्य, उध्वस्तपण, धर्मभावनेची कोंडी; असलं सगळं सुलतानीत होतं. म्हणूनच तर अवतारकार्य करायला संत जन्माला आले, कार्यरत झाले. आज आपण राज्यघटनेने बहाल केलेल्या आदर्श लोकशाहीत आहोत. दुर्दैवानं त्यातला 'शाही' भागच आज माजला आहे. म्हणून मूल्याचं मातेरे होतेय्. 'मरण स्वस्त होत आहे.' 'पहिले ते राजकारण' वर्चस्व गाजवतेय्. आर्थिक निरक्षरता आणि अज्ञान बोकाळलेय्. 'बिजली गगनात नाचेल आणि हवेली ढासळेल' अशी क्रांतिकारी जगजागरण करणारी वीज अजून तरी तांडव करत नाहीय्. बिचारे कोवळे जीव जीवन म्हणजे सुंदर काव्य- हे न समजून घेताच टपाटप आत्महत्या करून जगणं संपवताहेत. 'मनमानी' लोकशाही म्हणजे लोकशाहीचं विकृत रूप. त्याचा ही मुलं बळी जाताहेत. दुर्दैवी ठरताहेत. एकविसाव्या शतकातले आयाम वेगळे अन् सोळाव्या शतकातले वेगळेच. आजच्या परिस्थितीला परकीय आक्रमण नव्हे; तर संस्कृतीसंक्रमण जबाबदार आहे. याचा खोलवर विचार व्हायला हवा.

सुदैवाची बाब इतकीच की आपली ज्ञात या संक्रमणापासून जऽऽरा दूर आहे. पालक पाल्य यामध्ये आपल्या ज्ञातीत संवाद आहे. ज्ञातीसंस्थांमध्ये आपली माणसं, मुलं रंगताहेत. त्यातून मिळालेलं बळ घेऊन कर्तृत्वाचे पंख पसरताहेत. झेपावताहेत. त्यामुळं परिस्थितीला काटशह देत जगण्यातला आनंद त्यांना साजरा करता येतोय. मित्रहो हा आनंद आपण कायम जपला पाहिजे. 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हा आपला कोणत्याही परिस्थितीत मूलमंत्र आहेच; तो कायम राहिला पाहिजे. त्या मंत्रानं आपण भरून आणि भारून गेलं पाहिजे. खरं की नाही?

(पान१, कॉलम ४ वरून)

पडणाऱ्या लहरींमुळे हृदयविकाराची शक्यता वाढते. कॅन्सरसारख्या रोगाचा धोका उत्पन्न होऊ शकतो. एकसारखे मेसेज पाठवण्याने (Blackberry Thumb) अंगठ्याचा विकार जडू शकतो. हल्ली शाळकरी मुलांकडेही मोबाईल असणं ही सामान्य गोष्ट झाली आहे. मुलं आणि पालक यांच्यातला संवाद दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. त्याची कारणं अनेक असतील. पण मोबाईलचा वाढता वापर हेही त्याला कारणीभूत ठरत आहे. कदाचित सध्याच्या वाढत्या आत्महत्यांचं मूळ यातही असू शकेल!

मोबाईल म्हणजे भ्रमण-भ्रमंती. Mobile denotes mobility. पाश्चात्य जगात काही जणांची घरंसुद्धा मोबाईल असतात. भारतात मोबाईल येऊन पंधरा वर्ष झाली तरी mobility ही संकल्पना तशी रुळलेली नाही. हल्लीच्या फास्ट जमान्यात काही गोष्टी मात्र अजून मोबाईल झाल्या नाही आहेत.

कुठल्याही संशोधनाचे जसे फायदे तसेच तोटेही असतात. पण त्या तोटयांच्या परिणामांनी निरुत्साही न होता त्यांची तीव्रता कशी कमी करता येईल हे पाहिले पाहिजे. त्यावरच त्या संशोधनाचे यश अवलंबून असते. मोबाईलच्या वापराचे तोटे लक्षात घेऊन आपण त्याचा वापर आपल्या फायद्यासाठी केला तरच आपल्याला म्हणता येईल ना, 'आऽऽऽऽल इज वेऽऽऽऽल! ❑

## सोशल समाजाचे दिवाळी संमेलन २००९

शनिवार दि. १९ डिसेंबर २००९ रोजी सोशल समाजाचे दिवाळी संमेलन साहित्य संघ मंदिरात डॉ. शिशिर सिंग यांच्या अध्यक्षतेखाली साजरे झाले. प्रारंभी सोशल समाजातर्फे संगीत, फॅन्सी ड्रेस व एकपात्री अभिनय अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानंतर समारंभाचे अध्यक्ष व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मोना सिंग आणि स्पर्धांचे परीक्षक श्री. अनंत वेलणकर व सौ. रंजना धराधर यांना रंगमंचावर पाचारण करून त्यांचे पुष्पगुच्छ, भेटवस्तू व परभी पुरणपोळ्या देऊन स्वागत करण्यात आले. सोशल समाजाच्या अध्यक्ष सौ. प्रमिला मधुकर तळपदे यांना अपघात होऊन त्यांचा पाय जायबंदी झाल्याने त्या समारंभाला उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यामुळे समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. प्रमुख पाहुणे डॉ. शिशिर सिंग यांचा त्यांनी अल्प परिचय करून दिला. डॉ. शिशिर हे पूर्वाश्रमीच्या लीना त्रिलोकेकर यांचे सुपुत्र. म्हणजे त्यांची नाळ आजोबांकडून पाठारे प्रभु ज्ञातीशी अगदी घट्ट जोडलेली आहे. डॉ. शिशिर व त्यांच्या पत्नी डॉ. मोना हे दोघेही दंतवैद्यक शास्त्रातील ख्यातनाम डॉक्टर असून खार येथे त्यांचे क्लिनिक आहे. डॉक्टरांच्या शिरपेचातील अनेक मानाच्या तुऱ्यांचा श्रीमती स्वाती यांनी आपल्या परिचयपर भाषणात आवर्जून उल्लेख केला. अध्यक्षीय भाषणात डॉ. शिशिर यांनी त्यांच्या आजोबांच्या पाठारे प्रभु ज्ञातीतील अनुभवांना खुमासदार पद्धतीने उजाळा दिला. स्पर्धांच्या निकालाबद्दल बोलताना सौ. रंजना धराधर यांनी स्पर्धेतील उमेदवारांच्या अल्पसंख्येबद्दल खेद व्यक्त केला व जास्तीत जास्त बंधुभगिनींनी यात सहभागी होण्याचे आवाहन केले. पारितोषिक वितरण सौ. सिंग यांच्या हस्ते झाले. या संमेलनाच्या निमित्ताने सोशल समाजावर उदार दात्यांनी देणग्यांचा वर्षाव केला. त्यांची यादी समाजाचे चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांनी सादर केली व दात्यांचे आणि समारंभाच्या आयोजनातील सहकार्याबद्दल संबंधितांचे आभार मानले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचा प्रारंभ कु. आशीश विजयकर हिच्या सोलो नृत्याने झाला. 'दीपनृत्य' या नृत्यात ज्ञातीतील व ज्ञातीबाहेरील भगिनींनी भाग घेतला होता. याची खासियत म्हणजे बहुतांश भगिनी ४० वर्षे वयावरील होत्या. सौ. प्रमिला तळपदे यांच्या प्रोत्साहनामुळे या भगिनींनी 'हम भी कुछ कम नही' याचे प्रत्यंतर दिले. या नृत्यात योगिता नवलकर, नीता सेंजित, पल्लवी कोठारे, ऐश्वर्या धैर्यवान, आशा धैर्यवान, अरविंद शेहली, रश्मी पटेल, शकु व्यवहारकर, प्रिया कर्णिक व श्रेया तळपदे यांनी भाग घेतला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात नयना आपटे यांच्या एकपात्री सवेष अभिनयसंगीत संवाद या कार्यक्रमाने कळस चढवला. अखंड दीड तास प्रेक्षकांशी संवाद आणि कोणत्याही वाद्याची साथ न घेता क्षणार्धात सूर लावत त्यांनी सादर केलेल्या नाट्यगीतांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. भैरवीने त्यांनी या कार्यक्रमाची सांगता केली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नीता सेंजित यांनी केले. अध्यक्ष डॉ. शिशिर यांनी या प्रसंगी समाजाला रु. ५०००/-ची अनमोल देणगी दिली.

उपस्थित नव्या-जुन्या पिढीतील सर्वच प्रेक्षकांना हा कार्यक्रम अतिशय भावला.

**संगीत स्पर्धा-**

(पान ३ कॉलम ३ वर)

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे रविवार दिनांक १७ जानेवारी २०१० रोजी खार येथील पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्रात 'आनंद मेळावा' भरला होता. एकंदर ५४ स्टॉल होते. आर्ट ज्वेलरी, मसाले, पाणीपुरी, भेळपुरी, कोळंबीचे पॅटीस, चिकनचे पॅटीस, चिकन रोल, केक्स, चॉकलेटस्, गोयानीज फूड, चॉकलेटची केलेली खेळणी, काजू, केळ्याच्या, गाजराच्या पोळ्या, नॉनव्हेज घडा, तंदुरी, चिंबोऱ्या, लहान मुलांचे कपडे, सलवार खमीस, कुरता, वारली पेंटींग केलेल्या साड्या, तऱ्हेतऱ्हेच्या बॅगस्, बर्फीचे प्रकार, खरवस, कलिंगड सरबत, मटणसामोसे, अशी झुंबड होती.

आनंद मेळाव्याचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती भारती आचरेकर ह्यांच्या हस्ते झाले. त्यांनी आनंद मेळाव्यात विविधता असल्याचे सांगितले आणि दरवर्षी येण्याची इच्छा व्यक्त केली. महिला समाजाचे कौतुक केले. समाजाच्या अध्यक्षा सौ. वृंदा जयकर ह्यांनी त्यांचे स्वागत केले.

'प्रभुतरुण युवा मंच' तर्फे चार स्टॉल्स विशेष होते. त्यात इतर विक्रीबरोबरच प्रभुतरुणाची वेबसाईट सदस्य नोंदणी आणि नेत्रदानाविषयी जागरण करण्यात आले.

*****

पाठारे प्रभु महिला समाजाची त्रैवार्षिक निवडणूक एप्रिल २०१० मध्ये घेण्यात येणार आहे. ज्या सभासद भगिनींना (जन्माने पाठारे प्रभु असणे किंवा ज्ञातीत विवाह झालेला असणे आवश्यक आहे.) कार्यकारी समितीवर कार्य करण्याची इच्छा असेल त्यांनी ३० मार्चपर्यंत छापील अर्ज भरून द्यावेत. हे अर्ज १ मार्चनंतर सौ. नीता सेंजित, सौ. अक्षदा तळपदे, सौ. प्रतिभा विजयकर, सौ. मेघना राणे यांच्याकडे उपलब्ध होतील. पुढील पदांसाठी अर्ज मिळतील- सभासद (१२), चिटणीस (२३), खजिनदार(१). कार्य करण्याची इच्छा असलेल्यांनी संपर्क साधावा; असे आवाहन करण्यात आले आहे.

पाठारे प्रभु महिला समाज आयोजित राहण्याची सहल दि. २१ जानेवारी २०१० ते २६ जानेवारी २०१० या कालावधीत जयपूर, अजमेर व पुष्कर येथे गेली होती. सहलीत १७ भगिनी सहभागी होत्या.

पाठारे प्रभु महिला समाजाचा ९५ वा वार्षिक बक्षिस समारंभ सौ. मिनल मोहाडीकर यांच्या अध्यक्षते-खाली दि.२१-२-१० रोजी सायं. ४ वा. खारच्या पा. प्र. को. ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात साजरा होणार आहे. यावेळी सौ. स्वाती तारकनाथ जयकर, सौ. उर्वशी आनंद धराधर, सौ. अनुराधा विनोद धुरंधर, कु. उमा यतिन व्यवहारकर, कु. श्रद्धा मिलींद कोठारे यांना रौप्यपदके देण्यात येतील.

*****

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे शनिवार दिनांक ९ जानेवारी २०१० रोजी सुरेश विठ्ठल हॉल, ठाकुरद्वार येथे दुपारी ४ वाजता पुढील स्पर्धा घेण्यात आल्या.

१) कला कौशल्य स्पर्धा
विषय-कार्ड पेपरची ताटाभोवतालची महिरप तयार करणे (वेळ १तास)

२) सामान्य ज्ञान स्पर्धा (वेळ १ तास)
वयोगट ६ ते ९, १० ते १५, १६ ते २२
विषय- दिलेले पर्याय निवडून प्रश्नांची अचूक उत्तरे लिहिणे.

उपाध्यक्षा सौ.स्वाती जयकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

कला कौशल्य स्पर्धा
प्र.क्र.-सौ. पल्लवी परेश कोठारे
द्वि.क्र.-सौ. शेफाली पुष्पल विजयकर
तृ.क्र.-सौ. स्वप्ना विनित जयकर

सामान्य ज्ञान स्पर्धेत वयोगट १० ते १५मध्ये कु. आशिका पुष्पल विजयकर व कु. तनुश्री धीरेन धुरंधर ह्या दोघींना सारखे गुण मिळाल्यामुळे प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला.

चिटणीस सौ. नीता सेंजित ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कॉफी-पानाने कार्यक्रमाची सांगता झाली. ❑

किस्से कोर्टातले-

# क्रूरता

-सौ. बागेश्री योगेन परीख

कोर्टात घरस्फोटासाठी येणाऱ्या बऱ्याच केसेस 'हिंदु मॅरेज ॲक्ट'च्या कलम १३, आय. ए. म्हणजे क्रूरता, (मानसिक किंवा शारीरिक क्रूरता) ह्या कारणास्तव दाखल केलेल्या असतात. वादीने त्याला प्रतिवादीने क्रूरतेची वागणूक दिली आहे, हे सिद्ध करावं लागतं.

शारीरिक क्रूरता ही सिद्ध करणं फारसं कठीण जात नाही. नवरा मारतो, कधी शरीरावर माराच्या खुणा असतात. पोलीस तक्रारी केलेल्या असतात. साक्षीदार असतात. कधी कधी नवरा बायकोला मारल्याचं कबूलही करतो. तो त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे असंही त्याला वाटत असतं, त्यामुळे अशा गोष्टी सिद्ध करता येतात.

परंतु मानसिक क्रूरता ही अशी संज्ञा आहे की, त्याचं मोजमाप हे त्या दोन व्यक्ती, समाजातल्या कुठल्या घरातून आलेल्या आहेत, त्यांचा शैक्षणिक दर्जा, त्यांचं समाजातील स्थान व त्यांची मूल्ये, अशा अनेक गोष्टींवर अवलंबून असतं. अर्जदाराला कुठल्याही परिस्थितीत प्रतिवादी-बरोबर राहता येणं शक्य नाही हे कोर्टाला पटवून देण्याची जबाबदारी अर्जदारावर असते.

सुरेंद्र ह्या अंदाजे ४० वर्षे वय असणाऱ्या गृहस्थाने क्रूरतेच्या कारणास्तव घटस्फोटाची याचना केली होती. त्याची पत्नी सुनेत्रा एक पदवीधर होती. एल.आय.सी.मध्ये क्लार्क होती. त्यांना एक ५ वर्षांची मुलगीपण होती. छोटी चित्रा तिच्या आईबरोबर, आजीआजोबांसोबत म्हणजे सुनेत्राच्या माहेरी राहत होती. गेली दोन वर्षे सुरेंद्र व सुनेत्रा विभक्त झाले होते. सुरेंद्रचं म्हणणं होतं की, त्याचं लग्न दोघांच्याही संमतीने स्वजातीय मुलीशी, अगदी दाखवून चौकशी करून झालं होतं. लग्नानंतर त्याला कळून चुकलं की, सुनेत्रा खूप संशयी व हेकेखोर होती. सुरुवातीला दोघेही एकत्र कुटुंबात राहिले; परंतु मोठी जाऊ, दीर, नणंद कुणाशीही सुनेत्राचं पटलं नाही. छोट्या छोट्या गोष्टीवर ती खुसपट काढत राहिली.

स्वत: नोकरी करून कमावती असल्याने इतरांनी मला योग्य तो मान दिला पाहिजे व मी म्हणेन ती पूर्व दिशा; अशी थोडीशी मनोवृत्ती सुनेत्राची होती. तिला स्वतंत्र संसार करायचा होता. मोठ्या जाऊबाईंची सत्ता तिला मान्य नव्हती.

सुरेंद्रला कुटुंब सोडून वेगळं होताना खूप दु:ख झालं. पण संसार टिकवायचा ह्या एकाच उद्देशाने त्याने सुनेत्राचं म्हणणं मान्य केलं. काही दिवस चांगले गेले. सुरेंद्रला मुलीबद्दल खूप ओढा होता. चित्रा होती पण खूप गोड आणि लाघवी. सुरेंद्र तिला आपल्या कुटुंबात घेऊन जायला खूप उत्सुक असे. पण सुनेत्रा संबंध तोडायचीच भाषा करत असे. सुरेंद्रने एक नक्की ठरवलं होतं की ऑफिसमधून येताना रोजच आपल्या वडीलांना, भावाला, वहिनींना व त्यांच्या मुलांना भेटूनच घरी जायचं. कारण दोन्ही घरं जवळ जवळ होती.

सुनेत्राला याच्या मागे काही वेगळाच संशय आला व तो तिने उघड उघड बोलून दाखवला.

''तुझे व तुझ्या वहिनींचे नक्कीच संबंध असतील. नाहीतर तुला रोज त्या घरी जायची जरुरच काय?'' तिच्या ह्या रोखठोक सवालाने सुरेंद्र चांगलाच हादरला.

भाऊ वहिनी त्याला आई-वडिलांसारखे होते. त्याचा मोठा भाऊ त्याच्यापेक्षा १२ वर्षांने मोठा होता. वहिनीने आईची माया दिली होती.

सुरेंद्रला हे आरोप मान्य नव्हते. खूप समजावूनसुद्धा सुनेत्राचा हेका कायम होता. सुनेत्राच्या मनाप्रमाणे वागायचं ठरवूनसुद्धा सुरेंद्रला संबंध तोडता येत नव्हते. वयस्क वडीलांची पण काळजी भाऊ वहिनीच घेत होते.

चित्रावर तर मोठ्या जावेची सावलीसुद्धा पडू नये असं सुनेत्राचं मत होतं. तिचे आईवडील पण तिच्या विचारांना खतपाणी घालत होते. वहिनींच्या मुलांनासुद्धा काकाचं घर वर्ज्य होतं.

सुनेत्राची रोजची आदळाआपट, उणीदुणी चालूच होती. नवरा ऐकत नाही हे पाहून तिने त्याला धडा शिकवायचं ठरवलं. आणि सरळ सुरेंद्रच्या ऑफिसमध्ये त्याच्या बॉसला एक कागाळीचं पत्रच पाठवलं. सुरेंद्रचे त्याच्या वहिनीशी अनैतिक संबंध आहेत. अशा व्यक्तीला तुम्ही कामावर कसे ठेवता; असंसुद्धा तिने त्या पत्रात म्हटलं होतं. सुरेंद्र पूर्ण हतबल झाला होता. त्याची नोकरी गेली नाही. पण ऑफिसमध्ये ह्या पत्राची चर्चा मात्र झाली. सुरेंद्रचा तटस्थपणा सुनेत्रा स्वीकारू शकली नाही व बदला घेण्याची धमकी देऊन चित्राला घेऊन घर सोडून माहेरी निघून गेली.

कंटाळून सुरेंद्रने घटस्फोटाची केस दाखल केली. अजूनही सुनेत्रा सुधारेल असं त्याला मनोमन वाटत होतं. पण सुनेत्राचा हेका कायम होता. सुरेंद्रच्या विरुद्ध १ पी. सी. ४९८ ए ची केस दाखल करायलापण ती कचरली नाही. घटस्फोट सुनेत्राला नको होता. तिला लढायचं होतं. तिच्या प्रत्युत्तरातपण सुरेंद्रचे वहिनीशी संबंध आहेत हे नमूद करायला ती विसरली नाही.

कोर्टात केस चालू असताना तिला अनेकदा सुचविण्यात आलं की, 'तुला असं म्हणायचं आहे ना की, वहिनी dominating आहेत. त्यांचं सुरेंद्रवर वर्चस्व आहे.' तर तिने ठणकावून सांगितलं की, नाही सुरेंद्रचे त्याच्या वहिनीशी अनैतिक संबंध आहेत आणि हे मी पाहिलं आहे.

वहिनीची साक्ष काढण्यात आली. त्या म्हणाल्या की, 'माझ्या लग्नात सुरेंद्र फक्त १५ वर्षांचा होता. आईवेगळा लहान दीर म्हणून मी त्याला पोटच्या मुलासारखा वाढवला आणि ही मुलगी त्याचा इतका घाणेरडा अर्थ लावते आहे.'

वहिनींचं म्हणणं जास्त ग्राह्य वाटत होतं. कोर्टापुढे आलेले पुरावे, कागदपत्रे, खोट्या तक्रारी हे पाहता सुनेत्राचे आरोप बिनबुडाचे व ईर्षेपोटी केलेले आहेत हे सिद्ध होत होतं. अशा तऱ्हेने नवऱ्यावर आरोप करणं, पत्र लिहून समाजात त्याची नाचक्की करणं व कोर्टात हे आरोप सिद्ध करू न शकणं ही क्रूरता ठरत होती.

सुनेत्राची खूप कीव येत होती. तिला स्वत:ला काय पाहिजे होतं; तेच कळत नव्हतं. सुनेत्रासारख्या अशा अनेक व्यक्ती आपल्या समोर वावरताना दिसतात. ज्यांचं ध्येय फक्त सूड उगवणं एव्हढंच असतं आणि का; तर नवरा आपल्या मनाप्रमाणे वागत नाही म्हणून.

सुनेत्राची बाजू समजून घेण्याचा खूप प्रयत्न करूनही सहानुभूती तिच्याकडे सरकत नव्हती आणि मग मनात विचार येत होता की, देवाब्राह्मणांसमोर अग्नीला साक्ष ठेऊन जन्मोजन्मी एकत्र राहण्याची वचने घेणारी दोन माणसे असं जाणून बुजून एकमेकांशी अशी क्रूरतेने का वागतात? की परिस्थिती त्यांना असं वागण्यास भाग पाडते?

---

कै. विठोबा वासुदेवजी झावबा चॅरिटीज **झावबा श्री राम मंदिर** (गोरा राम) ठाकुरद्वार, मुंबई-४००००२ येथे श्री गजानन महाराज (शेगांव) यांच्या प्रकट दिनी (शुक्रवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०१० रोजी) महामहोपाध्याय डॉ. पंडीत एम्. जी. म्हाळंक (पुणे) यांच्या शुभहस्ते श्री गजानन महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

सर्व वाचकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा; अशी विश्वस्तांतर्फे विनंती करण्यात आली आहे.

(मंदीर दुपारी १२ ते ४ बंद राहील)

---

(पान २ कॉलम २ वरून)

१५ वर्षाखालील स्पर्धक-विजेतेस्पर्धक
प्र.क्र.-कु. अनुष्का आशीष नवलकर
द्वी.क्र.- युग परेश कोठारे
१५ वर्षावरील विजेते स्पर्धक-
प्र.क्र- सौ. मधु वसंत धुरंधर
द्वि.क्र.-दीप्ती बिपीन तळपदे
तृ.क्र.-सौ. क्षमा पद्मकुमार कोठारे

**फॅन्सी ड्रेसस्पर्धा-**

१५ वर्षाखालील -विजेते स्पर्धक-
प्र.क्र.-वेदांत नरेंद्र धैर्यवान
द्वि.क्र.-अनुष्का आशीष नवलकर
तृ.क्र.-आदिती सीमित देसाई

१५ वर्षावरील स्पर्धकात प्रवेशिका अधिक नसल्याने स्पर्धक श्रीमती सुरुपा राणे यांना समाजाचे बक्षिस देण्यात आले.

नाट्यछटा स्पर्धा- १५ वर्षाखालील-कु. युग परेश कोठारे -समाजपारितोषिक १५ वर्षावरील- श्रीमती सुरुपा राणे-समाजपारितोषिक.

---

## प्रभु सेमिनरी शाळा

सौ. हंसा विनय नायक यांच्या हस्ते ध्वजारोहण करून शाळेचा प्रजासत्ताकदिन साजरा झाला. श्री. विनय नायक यांच्या हस्ते क्रीडास्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री. विनय नायक यांचे भाषण झाले. नायक पतिपत्नीचा सचीव राजन विजयकर यांनी सत्कार केला. या दिनी कै. सुशील चंद्रसेन नवलकर यांच्या स्मरणार्थ अनामिक दात्या-कडून रु. १०,०००/-ची देणगी आणि डॉ. सुमन नवलकर यांचेकडून रु. २५१/-ची देणगी प्राप्त झाली.

मित्तल हॉस्पिटलतर्फे विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

❑

---

***खूषखबर***

प्रभुतरूणाची वेबसाईट नव्याने सुरू झाली आहे. **रु. १०००/- ऐवजी सवलतीची किंमत रु. ५००/- केली आहे.**
आजीव सदस्य व्हा आणि 'ऑन लाइन' प्रभुतरुण नियमित वाचा. पोष्टाचा होणारा विलंब टाळा.
वर्गणी कृपया
डॉ. सुरेखा बन्सी धुरंधर
नानी निवास, दिक्षीत रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई-५७
या पत्त्यावर पाठवावी.
वेबसाईट: www.prabhutarun.com

---

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



YUVA MANCH
Together Towards Tomorrow

## हो, मला गर्व आहे मी मराठी असण्याचा-ओ राजे...

**-चारुदत्त धैर्यवान**

एका सकाळी मला नंदूकाकांचा फोन आला. त्यांनी मला विचारले, 'तुला मराठी लिहिता येते का?' मला काही कळेना. हा असा प्रश्न विचारल्याने मी अनुत्तरीत झालो. मग काकांनी त्याचा खुलासा केला. त्यांना एक समस्या भेडसावत आहे. ती म्हणजे आपल्या ज्ञातीची दोन मराठी मासिके 'प्रभु प्रभात' व 'प्रभु तरुण' ह्या अंकासाठी त्यांना सध्याच्या तरुणाई-कडून काही लेख अपेक्षित आहेत. आणि तेदेखील आपल्या मातृभाषेत अर्थात चक्क मराठीत, Ooops!!

जरा कठीणच आहे बुवा! आमच्या आई-वडिलांनी त्यांना न मिळालेली गोष्ट आम्हाल देण्याच्या इच्छेने आम्हाला इंग्रजी माध्यमात शिकण्यासाठी पाठविले आणि आमच्या अभ्यासक्रमात इंग्लिश भाषा ही फर्स्ट लॅग्वेज म्हणून आली. आणि इथेच तर साला गोची झाली यार! आम्ही आईबाबा म्हणण्याऐवजी Mummy-Daddy बोलू लागलो. ही स्थिती आजच्या चाळीशीतल्या पिढीची तर आमची बाळे कॉन्व्हेंटमध्ये आणि ते सुद्धा ICSE/CBSE बोर्डात जिथे मराठी म्हणजे तोंडी लावायला पण नाही. आमची बाळे आता Mom-Dad् किंवा Mom/Pop वगैरे बोलतात आणि त्यांची आई (म्हणजे मॉम) चक्क त्यांना Yes, माझ्या Sweety darling असे म्हणून त्यांच्या भाषेत उत्तर देते आणि त्यांचे कौतुक करते. त्यामुळे ही बाळे त्यांची आई ज्या भाषेत बोलते तीच मातृभाषा असे समजू लागली आहेत. म्हणजेच `MARHINGLISH' (मर-हिंग्लिश).

तेव्हा आजची वृद्ध पिढी म्हणजेच सध्याचे आजी-आजोबा (माझे काका-काकी, मामा-मामी, आत्या, मावशी) आणि इतर मंडळी हीच तेवढी शुद्ध मराठी भाषिक शिल्लक आहेत. ह्याचाच अर्थ असा की शुद्ध मराठी भाषा बोलणारे लोक काही काळानंतर दिसणारसुद्धा नाहीत. ह्याचीच दुसरी बाजू अशी की काही वर्षांनी प्रभु प्रभात आणि प्रभुतरुण फक्त नावाला मराठी मासिके राहतील आणि त्यातले लेख कदाचित `MARHINGLISH' मध्ये असतील.

आज मला जसा नंदूकाकांनी फोन केला तसा कदाचित मी काही वर्षांनी माझ्या पुतण्याला फोन करीन आणि विचारेन, 'काय रे do you लिहितोस का? MARHINGLISH' मध्ये?'

आज आपण जर थोडा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की आपण पाठारे प्रभु, अगदी मूळचे मुंबईकर. मुंबई शिवरायांच्या मराठी मुलखात म्हणजेच महाराष्ट्रात आहे. तिथेच आपण आपली माय मराठी विसरत आहोत. आणि आपल्या मुलांना कुठली तरी वेगळीच मराठी, हिंदी, इंग्रजी मिश्र भाषा बोलायला लावतो. ज्या भाषेचे कुठेही अस्तित्व नाही. ती भाषा आपण गौरवाने वापरीत आहोत आणि स्वत:च्या मराठी भाषेचा वापर आपण नकळत टाळतो.

हे असे करून आपण आपल्याच हातांनी आपल्या पायावर धोंडा पाडून घेत आहोत असे मला वाटते. आपल्या पूर्वजांनी कायम त्यांचा मराठी बाणा राखला हे सर्व ज्ञात आहेच. त्यांना स्मरून मी तुम्हाला विचारू इच्छितो की, 'तुम्हाला असे नाही का वाटत की ही जी काही भाषा आपण बोलतो ती मराठी नसून कुठली तरी वेगळीच भाषा आपल्या मुलांपर्यंत पोहचवीत आहोत. ह्या भाषेला जगात कुठेच स्थान आणि मान्यता नाही.'

मी असे नाही म्हणत की आपण आपल्या मुलांना इंग्रजी शिकवू नये. पण असे जरूर म्हणेन की जर आपल्या मुलांना शाळेत मराठी हा विषय नसेल तर तो आपण त्यांना घरी शिकवायचा प्रयत्न का करू नये? कुठलीही भाषा शिकवायची तर ती पहिला लिहिता

(पान ६, कॉलम ३ वर)

## Pratyush is back

प्रत्युश '10
A NEW RISING

Pratyush is back. Remember the blast we had in 2009... Join in to recreate the magic. Calling all aspiring actors and dancers (age no bar) to participate in the grand celebration Pratyush '10 to be held on 5th June at Ravindra Natyamandir (Prabhadevi). Contact the following at the earliest:

Sanjana Kothare 9833110993, Mayura Nayak 9819932740
Kashmira Ajinkya 9819841146, Sushmita Kothare 9769860909

## Rendezvous with Dust

*- Anvay Ranjan Desai*

Aaahhhh-Chheeeeee! That's how I sneezed the other Saturday and everyone in the family came and asked me what is wrong? If it would had been few months back everyone would had mistaken it for Swine flu but my clothes garnished with dust and cobwebs made my mom realize who the real culprit is. After a lot of pressurizing and pestering done by my family, I finally had taken up the challenge to clean up the 'SO CALLED DUNGEON' i.e. My Room.

It's been almost a year since I last cleaned my room. I felt this task would be a piece of cake as dumping old notes and text books in a big trash bag is a simplest thing for me to do. However, I was proved wrong as the pile of the so called 'RADDI' was coated with a thick, heavy, sticky and at times painful layer of nostalgia.

One good thing which I have learnt from my dad, a botanist,- is classification and I had classified all my old books right from my first year of graduation to my final year of MBA in year-wise boxes. Once a box was opened by me, along with unleashing a lot of dust, it brought with it immediate memories of that particular year. I saw a book which was completely damaged at its corners and it immediately reminded me of 26th July 2005 when me along with a few friends and half of Mumbai city were stuck in a midst of no where. Only because my college friends were there with me, I could pass that unforgettable evening amongst jokes, college gossips and cup of tea offered by local residence whose warmth I will never forget. And slowly each and every box when opened unleashed a whirlpool of memories.

I was pulled out of my thoughts by the irritating noise made by the vacuum cleaner and my eyes fell on another such pile of photocopied notes. It is usually a practice in most colleges that THE SINCERE ONE WRITES AND THE REST OF THE CLASS (as a commonly used term) 'XEROXES'. One such bunch of notes had soiled corners with a yellowish tinge which reminded me of the 'CHAI KI TAPRI' next to the photo-copying centre. I still remember how we, as a group, used to sadistically make fun of everyone around us including the handwriting of the very person whose notes we were using.

I was almost over with my cleaning and my nostalgia spree when suddenly a very strong thought struck me. Every pile of the 'would be RADDI' symbolized unconditional friendship which is dwindling in the corporate life which I am currently a part of. Your college friends are not only your source of unlimited encouragement, but they are also triggers which channel your thought process that may shape your future (Phew! a pretty heavy line to digest, but true). Many a time due to pressures of one's day to day life we tend to slowly drift away from this very source.

All this heavy dose of dusty memories resulted in exhausting my cell phone pre-paid balance in no time as I messaged all my friends to keep in touch with them. Hence, I would urge all you readers, who are still enjoying your beautiful college days along with your friends, who offer you a daily dose of immense happiness and unconditional love, to live these moments to the fullest. Summing up this entire GYAAN and taking cue from Mastercard advertisements, I would like to say…

Pile of Raddi – Rs. 3/- per kg

Medicines to take care of sneezing caused by the dust – Rs. 20/-

Pre-paid card refill – Rs. 50/-

Fresh breeze of fond memories – ***PRICELESS!***

### A Rainy Novemer Day

The sky suddenly grew dark on a fine november day
There's a possibility of rain the forecasters would say
It starts raining soon
As if it was June

The rain drops continue to drop

All schools suddenly closed down
Putting a smile on every child's face across town
Mumbai is alerted for a tyrphoon
The least guard and navy better get ready for this soon

At least the rain comes to a halt
Giving a sigh of relief to all
Fortunately the tyrhoon changed its way
Unfortunately eliminating the possibliity of a holiday next day.

**-Arnav V. Vijayakar**
Class IX-B

शिदोरी

# 'निकालामध्ये तुमचा नंबरच नाही!'

-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर

दक्षिण भारतामधल्या आमच्या प्रवासामध्ये 'फोटोग्राफी' जेथे 'नॉट्ट अलाऊड्ड' होती अशा ठिकाणी कॅमेऱ्याच्या नादी न लागता 'स्केचपॅड झिंदाबाद' अशी माझी मुशाफिरी सुरू झाली; हे मागच्या वेळी सांगितले. सतत स्केचपॅड हातात आणि स्केचपेन्स खिशात घेऊनच मी फिरत असे. त्यातून बऱ्याच गंमतीजमती अनुभवास आल्या. त्यापैकी एक आज सांगावी म्हणते.

प्रवासामध्ये आमचा ग्रूप उटकमंडला, म्हणजे शॉर्टफॉर्म उटी, दोन दिवसांच्या मुक्कामासाठी पोहोचला तेव्हा दुपारचा एक वाजला होता. वातावरण अगदी प्रसन्न. स्वच्छ ऊन होते. तरीही कार्यक्रम ठरवल्या-प्रमाणे गाईडने सर्वांना सांगितले की आता सर्वांनी जेवून घ्या, आपापल्या रुममध्ये जाऊन विश्रांती घ्या आणि तयार होऊन साडेपाचला लाऊंजमध्ये जमा, म्हणजे आपण सगळे सहा वाजता उटी पाहायला जाऊ. त्याप्रमाणे सगळे जेवून रुमवर गेले. आता दोनपासून पाचपर्यंत करायचे काय? स्केचपॅड हातात घेऊन आमची स्वारी निघाली हॉटेलच्या आसपास फिरायला. नुसते हिरवेगार डोंगर, दाट झाडी, काही जुनी तर काही नवी अशी उतरत्या लाल छपरांची घरे, आणि बहुतेक बांधकामे प्रवाशांसाठी हॉटेल्स किंवा शॉपिंग सेंटर्स. आता यात काय करणार स्केचिंग? कंटाळून एक गोल राऊंड मारून मी आमच्या हॉटेलच्या मागच्या बाजूला आले. आमचे हॉटेल ज्या उतारावर होते तेथून मागे चढत गेलेली ती एक मोठी टेकडी होती. वर पुष्कळ झाडे होती. उंच, सरळसोट वाढलेली. तिथे पाहत पाहत मी आपली फिरत होते.

अचानक माझ्या लक्षात आले की टेकडीच्या माथ्यावर काही बांधकाम आहे आणि ते अगदी जुन्या ब्रिटीश स्टाईलचे आहे. त्या बांधकामात एक उंच निमुळता मनोरा होता. त्याच्या माथ्यावर जे सुंदर त्रिकोनी छप्पर बांधले होते ते पाहून मला भायखळ्याच्या रेल्वे हॉस्पिटलचा टॉवर आठवला. मनोऱ्यावरचे नक्षीकाम फारच नाजूक आणि सुंदर होते. मात्र आजुबाजूचे बांधकाम पाहून हे बिल्डिंग चर्चचे आहे किंवा काय हे काहीच कळेना! त्या संपूर्ण टेकडीवर किंवा मनोऱ्याच्या आजुबाजूला चिटपाखरूसुद्धा नव्हते.

मी आपला स्वत:शी अंदाज घेतला की त्या टॉवरचे चित्र काढायला किती वेळ लागेल, आणि एका झाडाच्या बुंध्याशी मारली बैठक. जेमतेम दहापंधरा मिनिटात तो टॉवर काढून झाला. आता उठणार तेवढ्यात त्या टॉवरकडून हातात दंडुके घेतलेली, राखाडी युनिफॉर्ममधली सातआठ माणसे आरडाओरडा करत धावत माझ्या दिशेने आली. सगळ्यांचे चेहरे विचित्र आणि चिडके. त्यांच्या भाषेत मोठ्या मोठ्याने गुडगुड चालले होते. मी आपली स्केचपॅड आवरून शांत उभी. एकाने मला विचारले, 'व्हाट्ट आर यू डुइंग हिअर्र?''

मी काही न बोलता टॉवरचे स्केच दाखवले. ते सर्वांनी झडप घालून पाहिले. तो म्हणाला, ''धिस इज् गुड्ड. बट् नॉट अलाऊड्ड. व्हेअर्र डू यू कम फ्रॉम?'' मी म्हटले, 'आर्टिस्ट. बॉम्बे. धिस टॉवर ब्युटिफुल, सो ड्रॉइंग, व्हॉट प्रॉब्लेम?'' तो म्हणाला, 'धिस बिल्डिंग डिफेन्स, नो फोटोग्राफी अलाऊड्ड. नो पर्मिशन.' मला हसू आले. डिफेन्सची प्रॉपर्टी आहे तर टेकडीला काटेरी कुंपण नको? तरी मी म्हटले, 'धिस इज नो फोटोग्राफ. ओन्ली ड्रॉइंग, इफ यू टेल आय कॅन डिस्ट्रॉय.' तो उत्तर देईना. मी ड्रॉइंग पेपर फाडायच्या पवित्र्यात. तोपर्यंत काय गोंधळ चाललाय ते बघायला रस्त्यावरचे लोक आणि आमचे गाईडसुद्धा तिथे धावत आले. गर्दी झाली. गाईडने अंदाज घेतला आणि माझ्या हातातून पॅड घेऊन त्यांना सर्व स्केचेस् दाखवली. त्या लोकांचा सूर जरा निवळला. तेवढ्यात त्यांच्यातला एक दीडशहाणा म्हणाला, 'आय थिंक्क शी इज अ स्पाई फ्रॉम चायना' आता मी काय चिनी दिसते का? इतका वेळ बाळगलेला माझा संयम संपला आणि मागचा पुढचा विचार न करता मी मोठ्याने ओरडले, 'च्यायला थोबाड फोडीन-' याचा अर्थ त्या गर्दीपैकी कुणालाच कळला नाही. तरीपण त्यांचा लीडर आणि आमचा गाईड मला म्हणाले, 'तुम्ही काय बोललात?' यावर अगदी निरुपद्रवी चेहरा करून मी उत्तर दिले, 'अहो, मी म्हटले की प्लीज् डोंट मिसअंडरस्टँड.' यावर त्यांचे समाधान झाले. चित्र फाडावे लागले नाही. सगळी गर्दी पांगली. मी गाईडला म्हटले की यांचा कोण बॉस असेल त्याला भेटूया चला- गाईड म्हणाले ''काही गरज नाही.'' नंतर आमच्या ग्रूपमधल्या, बसमधल्या सगळ्या प्रवाशांना गाईडनी ते टॉवरचे चित्र दाखवून ही स्टोरी रंगवून रंगवून सांगितली. दोन दिवसांनी उटी सोडून बस पुढच्या प्रवासाला निघाली तेव्हा मी गाईडना 'थोबाड फोडीन'चा खरा अर्थ सांगितला, तेव्हा मात्र हसून हसून गाईडचे पोट फुटायची वेळ आली!

अशाच एका अनपेक्षित घटनेमधून बऱ्याच वर्षांपूर्वी विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती, पण सुदैवाने कथेचा शेवट आनंदात झाला.

बऱ्याच वर्षांपूर्वी युनिव्हर्सिटीच्या परीक्षांचे नंबरवार निकाल वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध व्हायचे. उत्सुकतेपोटी पेपर्सच्या ऑफिसात जाऊन किंवा फोन करून आपापले नंबर शोधले जायचे.

असाच एकदा इंटर आर्टस्चा निकाल लागणार होता. माटुंग्याच्या रुइया कॉलेजच्या एका तल्लख विद्यार्थिनीला झगझगीत यश तर मिळणार होतेच; फक्त एकूण मार्क्स किती हे पाहायचे होते. तिच्या घरून पेपरला फोन गेला की अमुकअमुक नंबरचा रिझल्ट बघून सांगता का- आणि त्यांनी तिथून थोड्या वेळाने सांगितले की सॉरी, हा नंबर निकालाच्या लिस्टमध्ये नाही. बाप रे! हा तर वज्राघातच! घरचे सारे हडबडून गेले. कुणाला तरी सुचले की पेपरच्या ऑफिसातच जाऊन पाहू. त्याप्रमाणे सगळे तिथे पोहोचले. तिथले सगळे निकालाच्या गडबडीत कावून गेलेले. ते म्हणाले, 'अहो तुमचा नंबर आम्ही दोनदा पास क्लासमध्ये पाहिला, दोनदा सेकंड क्लासमध्ये पाहिला. तुमचा नंबर नाहीच! 'अहो फर्स्ट क्लासमध्ये पाहिलात का?' तर फर्स्ट क्लासमध्ये संपूर्ण युनिव्हर्सिटीत एकच नंबर आलाय- 'तर मग पाहता का प्लीज?' तेव्हा त्यांनी नाईलाजाने पाहिला- आणि तो एकमेव फर्स्ट क्लासचा नंबर रुइयाच्या मंगला राजवाडेचा होता, ज्यांना आज आपण सौ. मंगला जयंत नारळीकर म्हणून ओळखतो! नंतर त्यांच्यावर असंख्य पारितोषिकांचा वर्षाव झाला. तरीदेखील 'तुमचा नंबर निकालाच्या लिस्टमध्ये नाही' ही तेव्हा मिळालेली विचित्र आणि विनोदी हूल त्या अजून विसरल्या नसतील!

# मराठीतले पहिले वर्तमानपत्र 'दर्पण'चे मालक रामचंद्र लक्ष्मण अजिंक्य व जनार्दन वासुदेव आगासकर

-प्रताप वेलकर

मराठी भाषेतले पहिले वृत्तपत्र असणाऱ्या 'दर्पण'चे मालक रामचंद्र लक्ष्मण हरिश्चंद्रजी अजिंक्य व जनार्दन वासुदेव आगासकर होते आणि संपादक होते. बाळशास्त्री जांभेकर शिवाय 'दर्पण'चे इंग्रजी वर्तमानपत्रही अजिंक्य, आगासकरांनी काही काळ चालविले होते. 'दर्पण' रजिस्टर झाले त्या सरकारी कागदपत्रांवर अजिंक्य, आगासकर, जांभेकर तशा अनुक्रमे सह्या आहेत. ही सर्व माहिती वाचकांच्या परिचयाची आहे आणि असावी.

प्रस्तुत लेख लिहिण्यास कारण की, अलिकडेच 'दर्पण' वृत्तपत्राला पावणेदोनशे वर्षे झाली म्हणून मुंबई महानगर पालिकेतर्फे तेथील प्रमुख चौकाला 'दर्पण'कार जांभेकर यांचे नाव देण्यात आले. संपादक जांभेकरांचे नाव झाले हे ठीक झाले; तथापि राजकारणी व वृत्तपत्र-व्यावसयिकही, आणि साहित्यिक उद्घाटन प्रसंगी व वृत्तपत्रांत 'दर्पण' वर्तमानपत्र पहिले मराठीतले व इंग्रजीतले ज्या अजिंक्य आणि आगासकर ह्यांनी काढले; त्या दोघांची नावे घेण्यास सोयिस्करपणे विसरले. याची खंत वाटली म्हणून वाचकांच्या माहितीसाठी प्रस्तुत लेख लिहिणे अपरिहार्य झाले.

गतकालीन वृत्तपत्रांचा इतिहास लक्षात घेतल्यास आपणास असे आढळून येईल की वृत्तपत्रांच्या संपादकाच्या नावाचा उल्लेख शेवटच्या पानावर, अंतिम टीपमध्ये कधीही छापून येत नसे. किंबहुना तशी पद्धत नव्हती. याउलट, मालका-करिता छापून प्रसिद्ध केले, असा स्पष्ट उल्लेख त्यात असे. याची दखल विचारवंत साहित्यिक मंडळींनी का घेतली नाही? याचेच वाईट वाटते.

लोकमान्य टिळक चरित्रात, साहित्यसम्राट न. चि. केळकर यांनी तसा स्पष्ट उल्लेख केला आहे. केळकर लिहितात, 'टिळक केसरीचे संपादक असूनही, केसरी वृत्तपत्र टिळकांचे नव्हे तर, मालकाकरिता छापून प्रसिद्ध केले.' असा उल्लेख आहे. हे ऐतिहासिक सत्य. आमचे वृत्तपत्रीय सहकारी 'दर्पण'च्या मालकाला कसे विसरले? उद्घाटन प्रसंगी व सार्वजनिक वृत्तपत्रांत त्यांच्या नावाचा विसर पडला. कोणत्याही वृत्तत्राचा इतिहास परिपूर्ण असायला पाहिजे. भले, तुम्ही रस्त्याला संपादकाचे नाव द्या, परंतु उत्सवप्रसंगी ज्यांनी वृत्तपत्र सुरू केले, त्यांना कसे विसरता?

उदा.(संदर्भ-टिळक चरित्र पृष्ठ १९५.)

ता. २५ ऑक्टोबर १८९७ रोजी टिळक केसरीचे प्रकाशक म्हणून जाहीर झाले. त्यावेळच्या छापखान्याच्या कायद्याच्या उदासीन वृत्तीमुळे हल्लीप्रमाणे वर्तमानपत्रावर प्रकाशकाचे किंवा संपादकाचे नाव स्पष्टपणे लिहिण्याचे कारण नव्हते. टिळक केसरीचे संपादक झाले तरी पत्राच्या चौथ्या पानाच्या शेवटी नेहमीप्रमाणे, 'आर्यभूषण छापखान्यात मालकाकरिता छापून प्रसिद्ध केले.' येवढेच शब्द येत असत. तेव्हा 'दर्पण'च्या मालकाला अनुल्लेखून उत्सवप्रसंगी ह्यांनी काय मिळविले? असा प्रश्न साहजिक उभा राहतो.

पहिला चित्रपट कीर्तिकरांचा पुंडलिक, पहिला संगीत नाटककार त्रिलोकेकर, तेवढाच महत्त्वाचा इतिहास-मराठीतले पहिले वृत्तपत्र अजिंक्य आगासकरांनी काढले हा होय. तेव्हा माझ्या पाठारे प्रभु भगिनी बांधवांनो, पाठारे प्रभूंच्या उज्ज्वल इतिहासाबद्दल सदैव जागरूक राहा. इतिहास बदलता येत नाही. पण त्याची उजळणी पुन्हा पुन्हा करावी लागते. तेव्हाच पुढच्या पिढीतही अभिमान जागा होतो. तो जागा होऊ द्या.

## प्रभुतरुणास देणग्या

❀ सौ. अनुराधा आणि डॉ. विनोद धुरंधर यांच्याकडून त्यांचा नातू श्री. रोहन यांच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. १००१/-

❀ श्री. राजस उल्हास राणे यांजकडून प्रभुतरुणाचे वेबसाईट सदस्यत्व रु. ५००/-

❀ चि. ध्वनीत विनेश रामकृष्ण तळपदे पाच वर्षांचा झाल्याप्रीत्यर्थ आजी सौ. ज्योत्स्ना आणि आजोबा श्री. रामकृष्ण तळपदेंकडून रु. २५१/-

❀ सौ. मृणाल बकुलचंद्र नवलकर याजकडून भाऊबीज रु. १०१/-

❀ श्री. प्रताप मो. वेलकर यांजकडून रु.१००/-

## प्रतिक्रिया

संपादिका, प्रभुतरुण,

नव्या वर्षाच्या सुरुवातीस दोन नवीन सदरांची भेट दिल्याबद्दल धन्यवाद.

पिढी दर पिढी विचार धारणांमध्ये मतभेद हे असतातच, हे सर्वांना ठाऊक आहेच. ह्यात माझ्या पिढीत एकत्र कुटुंबाऐवजी स्वतंत्र वेगळा संसार थाटण्याचे खूळ प्रचलित होते. पण नवरा बायको नोकरी करत असल्यामुळे मुलाबाळांच्या देखरेखी-साठी आईवडील/ सासूसासऱ्यांची गरज भासू लागे. त्यामुळे आता ह्या वडिलधाऱ्यांना जवळ करून राहण्याची प्रथा पुन्हा येऊ लागली असली तरी My space, My quality time, My life style असे काही बडबडून घरात नातेवाईक, पाहुणे मंडळी असो वा नसो; ठरल्यावेळी मॉलला भेट देऊन life style चे प्रदर्शन करण्यात मोठेपणा मानणारा रुक्ष समाज तयार होण्याआधी 'किस्से कोर्टातले'चे प्रकाशन मार्गदर्शन ठरू शकते. अर्थात ते जर वाचले गेले तर! ह्या सदरांकडे लक्ष जावे म्हणून हे सदर युवामंचाच्या पानावर असावे. शक्यतो देवनागरी लिपीत की कसे? जरुरत भासल्यास विस्तारीय संपादकीयचा विस्तार कमी करून. असे माझे प्रांजळ मत आहे. सौ. पारीख ह्यांना काउन्सिलींगचा अनुभव असल्याने दोन्ही बाजू त्यांच्या लेखणीतून उत्तमरित्या उतरतीलच.

'शिदोरी' प्रवासवर्णन/ अनुभव सांगणारे असल्याने आर्कषकच ठरेल अशी आशा बाळगतो. लगे रहो, प्रभुतरुण लगे रहो.

**-उदय बा. जयकर**

## अभिनंदन

❀ 'ब्लॅक स्वान' तर्फे अमराठी भाषकांसाठी कविता, गद्य, व्याकरण आदींच्या पुस्तकमालिका प्रकाशित झाल्या. डॉ. सुमन नवलकरांच्या लेखनकार्याचे त्यात योगदान आहे. अभिनंदन.

❀ कु. विनीता सुरेश नवलकर हिला सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून रुइया कॉलेजचा यमुनाबाई हिर्लेकर पुरस्कार प्राप्त झाला. अभिनंदन.

❀ श्री. निहाल तुषार कीर्तिकर यांनी कालीना येथे नुकत्याच पार पडलेल्या मुंबई विद्यापीठाच्या 'झेस्ट फेस्टिवल' मध्ये टेबल टेनिस डबल्सचे प्रथम पारितोषिक आणि सुवर्णपदक पटकावले. अभिनंदन.

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाचा गुढीपाडव्या रोजी येणारा स्थापना दिन व वार्षिक बक्षिस समारंभ मंगळवार दि. १६ मार्च २०१० रोजी सायंकाळी ५ वाजता प्रभुनगर येथील पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्र, खार(प.) १२ वा रस्ता, गायत्री मंदिराशेजारी 'जर्मनी' येथे स्थायिक असलेले श्री. मंदार माधव नायक यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे. तरी या पारितोषिक वितरण समारंभाला आमंत्रित यशस्वी विद्यार्थ्यांनी व समस्त ज्ञातीय बंधुभगिनींनी वेळेवर हजर राहावे अशी विश्वस्त व कार्यकारी समितीची आग्रहाची विनंती.

❑

## चुकीची दुरुस्ती

गतांकी महिला समाजाच्या सहलीचे वृत्त अनवधानाने सोशल समाजाचे म्हणून दिले होते. 'महिला समाजाचा ९५ वा वार्षिक बक्षिस समारंभ' असे तेथे वाचून त्या समारंभाच्या अध्यक्षा मीनल मोहाडीकर आहेत याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.


// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //



**प्रकास्व कॅटरर्स**

**शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!**

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत.*
*पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*
*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय*
*सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो.*
*खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

९-२-१० सौ. साक्षी आणि श्री. नीलेश उदय झावबा, पुत्र
१२-१२-०९ श्री. शंकर अमूल जयकर, पुत्र

### नारळ साखर दिला

| | | |
|---|---|---|
| १९-१-१० | श्री. आनंद दिलीप चुनीलाल धुरंधर | कु. रुषाली राजीव सबनीस (आं.ज्ञातीय) |

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| १७-१-१० | श्री. रोहन निखील विनोद धुरंधर | कु. एमिली रॉबर्ट मॅकॲलीस्टर आं.ज्ञातीय) |
| १२-१२-०९ | कु. अनघा अमूल जयकर | श्री. कीरण सुधाकर सावंत (आं.ज्ञातीय) |
| १३-१३-०९ | श्री. प्रशांत प्रदीप तळपदे | कु. अपर्णा विजय सोनटक्के (आं.ज्ञातीय) |
| ७-२-१० | श्री. चैतन्य गौरांग श्रीकृष्ण कीर्तिकर | कु. मैथिली विजय गडकर (आं.ज्ञातीय) |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३१-१२-०९ | श्री. नागेंद्र वसंतराव नवलकर, | वय ९० | पुणे |
| २०-१-१० | तरुबाला कनु धुरंधर | वय ८० | पुणे |
| १६-१२-०९ | श्री. रवींद्र सूरजनाथ जयकर, | वय ८० | खार |
| २१-१२-०९ | श्री. रवींद्र गोविंदराव धुरंधर | वय ७८ | मीरारोड |
| २२-१२-०९ | श्रीमती मीरा गजानन धराधर | वय ७४ | विलेपार्ले |

(पान ४, कॉलम २ वरून)

वाचता आली पाहिजे. तरच ती शुद्ध बोलता येईल. आपण सगळे मराठी बोलतो. पण ते कितपत शुद्ध आहे? लिहितो. पण ते कितपत व्याकरण-संगत आहे? हे आपणच तपासून पाहणे गरजेचे आहे. अजून आपण आपल्या ज्येष्ठ पिढीच्या सहवासात आहोत. त्यांच्या मदतीने आपण आपल्या मुलांना शुद्ध मराठीचे ज्ञान देऊ शकतो. कधी आपल्या नातेवाईकांमध्ये गेलो तर जास्तीत जास्त मराठीचा वापर करू या. आपले मराठीपण जपू या आणि वाढवू या. आपणच आपल्या मातृभाषेचा मान राखायला हवा. जेणेकरून इतर भाषिक आपल्या भाषेचा अवमान करणार नाहीत. आज आपली मुंबई बहुभाषिक झाली आहे. इथे स्थायिक झालेल्या अनेक धर्मीय माणसांच्या व त्यांच्या मातृभाषांच्या गर्दीत आपली माय मराठी हरवून जाऊ नये म्हणून आपणच जागरुक राहायला हवे. जसा पाठारे प्रभु गिरगावांतून नाहीसा होत चालला आहे तशी आपली भाषा, मराठी संस्कृती मुंबईतून लोप पावू नये म्हणून प्रयत्न करायला हवे.

हल्लीच दूरदर्शनवर पाहिले आणि ऐकले की आज महाराष्ट्रात फक्त ६५ टक्के मराठी जनता आहे आणि जर त्यातले काही मराठी भाषिक जर कुठली तरी वेगळीच भाषा शिकत-बोलत असतील तर ह्या शिवरायांच्या मराठी मुलुखाचे अस्तित्वच राहणार नाही.

आता इथेच थांबतो. कारण ह्या विषयावर लिहीण्यासारखे खूप आहे. असो. हा मराठी अस्तित्वाचा प्रश्न आहे ज्यावर बरीच राजकारणी मंडळी बोलत आहेत. माझा हेतू मराठीत लेख देण्याचा आहे आणि त्याचबरोबर माझ्या ज्ञाती बांधवांना मी सांगू इच्छितो की मराठीचा प्रसार करा. आपल्या पुढील पिढीमध्ये मराठी भाषेविषयी आत्मीयता निर्माण करू या. आपले मराठीपण जपू या.

हो. गर्व आहे मला मी मराठी असण्याचा-ओ राजे....

जय मराठी! जय महाराष्ट्र!

### परीक्षेतील सुयश

**एलिमेंटरी ड्रॉईंग**

शौनक कौशिक जयकर,
प्रथम श्रेणी (ए ग्रेड)


*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.
Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.
Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees: PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA" Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri(W), Mumbai-400 053.
Tel. : 2630 3902 / 2630 3906 Mobile : 9821447675
Booking Mobile : 09823884094 / 09422543614